'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

## पहलगाम हल्ल्यानंतर एका महिन्यात राहुल गांधी दुसऱ्यांदा काश्मीरमध्ये

**पुणे :** राहुल गांधी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर एका महिन्यात दुसऱ्यांदा जम्मू-काश्मीर दौऱ्यावर पोहोचले. राहुल यांनी श्रीनगरनंतर आज (२४ मे) पूंछमध्ये पोहोचले. त्यांनी पाकिस्तानी गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. शाळकरी मुलांना भेटत त्यांना प्रोत्साहन दिले आणि मी तुम्हाला खूप प्रेम करतो असे सांगितले. राहुल म्हणाले की लवकरच सर्व काही ठीक होईल.

✲ वर्ष २ रे ✲ अंक ३४ वा ✲ रविवार दि. २५ मे २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✲ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

# ८ दिवस आधीच केरळमध्ये मान्सून दाखल

### पुढील चार दिवस पावसाचा अंदाज; रायगड, रत्नागिरीला रेड अलर्ट

**मुंबई :** आज केरळमध्ये मान्सून दाखल झाला आहे. तो १ जून या त्याच्या नियोजित वेळेच्या ८ दिवस आधी केरळमध्ये पोहोचला आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, १६ वर्षांत पहिल्यांदाच मान्सून इतक्या लवकर पोहोचला आहे. २०२४ मध्ये तो ३० मे रोजी केरळमध्ये पोहोचला.



राज्यभर अवकाळी पाऊस सुरू असताना नैऋत्य मॉन्सून केरळमध्ये पुढील दोन ते तीन दिवसांत दाखल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, दक्षिण कोकण आणि गोव्यालगत असलेल्या मध्य, पूर्व अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, ते सध्या स्थिर आहे. या दरम्यान महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढील तीन ते चार दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. वातावरण अनुकूल नैऋत्य मॉन्सून आरबी समुद्राच्या दक्षिण भागातील काही उर्वरित भागांमध्ये, मालदीव आणि कोमोरॉन क्षेत्राच्या उर्वरित भागांमध्ये, लक्षद्वीप, केरळ, कर्नाटक, तमिळनाडूच्या काही भागांमध्ये, तसेच दक्षिण मध्य बंगालचा उपसागर, उत्तर बंगालचा उपसागर आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही भागांमध्ये पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल होत आहे.

#### रायगड, रत्नागिरीमध्ये शुक्रवारी मेघगर्जना

विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. या दोन्ही जिल्ह्यांना रेडफ अलर्ट देण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई सिधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर आणि सातारा जिल्शाच्या घाट विभागात तुरळक ठिकाणी विजांचा कटकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.


रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्ये काही भागात अतिवृष्टीची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात देखील जोरदार पावसाचा अंदाज आहे. मुंबईत पावसाचा जोर कमी राहणार असून, बलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईत बादळो वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. रायगडसाठी अरिंज अलर्ट जारी केला आहे, अतिमुसळधार ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढील दोन दिवसांत मान्सून केरळात दाखल **(पान २ वर)**

# पुण्याच्या खराडीत बनावट कॉल सेंटरचा पर्दाफाश


**पुणे :** पुण्यातील खराडी परिसरात सुरू असलेल्या बनावट कॉल सेंटरवर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने छापा टाकला आहे. दीडशे ते दोनशे पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांसह ही कारवाई करण्यात आली आहे. खराडी-मुंढवा बायपास रस्त्यावर प्राईड आयकॉन नावाची ही इमारत आहे. या इमारतीमधून हे बनावट कॉलसेंटर चालवले जात असल्याची माहिती आहे. यामध्ये कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या अनेक तरुण-तरुणींना ताब्यात घेण्यात आलं आहे.

खराडी-मुंढवा बायपास रस्त्यावर प्राईड आयकॉन नावाच्या इमारत आहे. या इमारतीमधून हे बनावट कॉलसेंटर चालविले जात असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. दीडशे ते दोनशे पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा या ठिकाणी दाखल झाला, या इमारतीमधून हे बनावट कॉलसेंटर चालवले जात होते. त्या अनुषंगाने पोलिस तपास करत आहेत. दरम्यान, या छाप्यानंतर सायबर फ्रॉडचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. पुण्यातील मॅग्रेटल बीपीएस अँड कन्सल्टन्सी एलएलपी हे कॉल सेंटर आहे. पोलिसांनी छाप्यामध्ये अनेक महत्त्वाचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. **(पान २ वर)**

**नवी कोरी पुस्तकं**




**घेतलंय स्टेअरिंग हाती**
: लेखकाचे नाव :
पद्मरेखा धनकर
किंमत रु. : २५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर




**रानभुलीचे दिवस**
: लेखकाचे नाव :
संतोष आळंजकर
किंमत रु. : २४०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

# काश्मीरमध्ये अहिल्यानगरच्या सुपुत्राला वीरमरण

**श्रीनगर :** काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात गुरुवारी सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांना घेरलं. यावेळी झालेल्या चकमकीत दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. या मोहिमेत एक जवान शहीद झाला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सुरक्षा दल छत्रतील शिंगपोरा परिसरात दहशतवाद्यांचा शोध घेत होते. तेव्हा दहशतवाद्यांकडून गोळीबार केला गेला. यात



गंभीर जखमी झालेला जवान उपचारावेळी शहीद झाला. संदीप गायकवाड असं जवानाचं नाव असून ते अहिल्यानगर जिल्ह्यातील होते. **(पान २ वर)**

### महसूल विभागाकडून तब्बल ६० वर्षानंतर बदल

# बांधावरचा शेत रस्ता यापुढे १२ फुटांचा

**मुंबई :** शेतीच्या बांधावरून जाणारा शेत रस्ता यापुढे १२ फुटांचा असणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रालयाने तब्बल साठ वर्षानंतर हा बदल करण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे आधुनिक शेतीसाठी बळ मिळणार असून ट्रॅक्टर, ट्रक, हार्वेस्टर यासह मोठी शेत अवजारे शेतात येणे सहज शक्य होणार आहे. त्याचबरोबर शेत रस्त्याची सातबारा उताऱ्यावर



देखील नोंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. महसूल विभागाकडून काढण्यात आलेल्या अध्यादेशात म्हटले आहे की, ते शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा पूर्ण लाभ मिळवून देण्यासाठी म्हणजेच मोठे कृषी अवजारे (उदा. ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टर, इत्यादी) यांच्या वाहतुकीसाठी आणि शेतीमालाच्या जलद व सुरक्षित वहनासाठी शेतरस्त्यांबाबत शेतकऱ्याची मागणी व आवश्यकता, थानिक भौगोलिक परिस्थिती याबाबत संबंधित सक्षम अधिकारी / प्राधिकारी यांनी तपासणी करुन पारंपारिक अरुंद शेतरस्त्यांऐवजी किमान ३ ते ४ मीटर रुंद असलेले शेतरस्ते उपलब्ध करुन द्यावेत. **(पान २ वर)**

# आपटे वाचन मंदिरातर्फे साहित्यकृती पुरस्कार जाहीर

**इचलकरंजी :** शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आपटे वाचन मंदिरातर्फे यंदाचे विविध साहित्यकृती पुरस्कार जाहीर केले आहेत.

यात कादंबरी पुरस्कार', 'रानभुलीचे दिवस' या ललित गद्य साहित्यकृतीसाठी संभाजीनगरचे संतोष आळंजकर यांना तर लक्षणीय साहित्यकृतीत संकेत म्हात्रे यांच्या 'तिथे भेटूया, मित्रा' आणि पद्मरेखा धनकर यांच्या 'घेतलंय स्टेअरिंग हाती',




या दोन काव्यसंग्रहांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२६ पासून उत्कृष्ट काव्यसंग्रह, गद्य साहित्यकृती व लक्षणीय साहित्यकृती यांच्या पुरस्कारांची रक्कम दुप्पट करणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## अमेरिकेतून भारतात पैसे पाठविण्यावर कर


**न्यूयॉर्क :** अमेरिकेच्या संसदेतील कनिष्ठ सभागृह प्रतिनिधी सभेत वन बिग, ब्यूटीफुल कायदा पास करण्यात आला आहे. त्यानुसार, अमेरिकेत वास्तव्य करुन तिथं कमाई करुन दुसऱ्या देशात पैसे पाठवण्यासाठी आता कर द्यावा लागणार आहे. २०१७ च्या कर कपातीला पुढं नेण्याचा प्रयत्न या विधेयकातून करण्यात आला आहे. बिलाच्या अंतिम ड्राफ्टमध्ये रेमिटंस टॅक्स ५ टक्क्यांवरुन ३.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे.

# राजेंद्र आणि सुशील हगवणेला २८ तारखेपर्यंत पोलीस कोठडी

### वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण : स्वारगेट येथून दोघांना अटक

**पुणे :** पुण्यातील वैष्णवी हगवणे यांच्या आत्महत्या प्रकरणाने संपूर्ण राज्याला हदरवून सोडले आहे. वैष्णवी यांच्या आई-वडिलांनी केलेल्या आरोपांनुसार वैष्णवी यांना लग्नानंतर सासरच्या लोकांकडून शारीरिक त्रास होत होता. हुंड्याच्या मागणीसाठी त्यांना सातत्याने मारहाण होत होती.

वैष्णवी यांच्या आत्महत्येनंतर त्यांचा दीर सुशील हगवणे आणि सासरा राजेंद्र हागवणे फरार होते. मात्र, शुक्रवारी (दि. २३) पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सासरे राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणेला स्वारगेटमधून अटक केली



आहे. काल हगवणे पिता-पुत्राची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्या दिवसापासून राजेंद्र हगवणे आणि वैष्णवी यांचा दीर सुशील हगवणे हे फरार होते.

# छगन भुजबळ यांचं मंत्रिमंडळात पुरागमन

**मुंबई :** राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचं मंत्रिमंडळात पुरागमन झालं आहे. मात्र मंत्री झाल्यानंतर छगन भुजबळ यांनी केलेल्या एका वक्तव्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावल्या. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे परत आलोय असं वक्तव्य भुजबळ यांनी केलं. त्यामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा चर्चांना उधाण



आलंय.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भरघोस यश मिळवल्यानंतर राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून दूर ठेवण्यात आलं होतं. मात्र जवळपास ६ महिन्यांनंतर भुजबळांचं मंत्रिमंडळात कमबॅक झालंय. त्यांना अन्न आणि नागरि पुरवठा खातंही देण्यात आलंय. मात्र मंत्री मंडळात पुनरागमन झाल्यानंतर छगन भुजबळ यांनी केलेल्या एका वक्तव्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावलेत. **(पान २ वर)**

# आश्रम शाळांमध्ये १७९१ कंत्राटी शिक्षकांची भरती

### राज्य शासनाचा निर्णय : निविदा प्रक्रियेसाठी ८४ कोटी ७४ लाखांचा निधी

**मुंबई :** आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारित ४९७ शासकीय आश्रम शाळा, ५५६ अनुदानित आश्रम शाळा आहेत. कंत्राटी पद्धतीने उपलब्ध केल्या जाणाऱ्या शिक्षकांमध्ये २२९ उच्च माध्यमिक शिक्षक, ४५५ माध्यमिक शिक्षक, १२० पदवीधर प्राथमिक शिक्षक, १७८ प्राथमिक शिक्षक इंग्रजी, ८०९ प्राथमिक शिक्षक मराठी यांचा समावेश असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

आदिवासी विभागाने आश्रम शाळांमध्ये शिक्षकांच्या १७९१ मंजूर पदांची सेवा बाह्यस्रोतांद्वारे (कंत्राटी) उपलब्ध करून घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी ८४ कोटी ७४ लाख ५५ हजार रुपये इतक्या अंदाजित रकमेच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला.

१६ नोव्हेंबर २०२२ च्या निर्णयाद्वारे आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. या सुधारित आकृतिबंधानुसार आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांतील शिक्षकांच्या मंजूर १७९१ पदांच्या सेवा बाह्यस्रोतांद्वारे उपलब्ध करून घेण्यासाठी जीईएम संकेतस्थळावर निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे.

मात्र, 'राज्यात शिक्षकांच्या भरतीसाठी पवित्र संकेतस्थळामार्फत प्रक्रिया राबवण्यात येत असताना आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारितील शाळांमध्ये बाह्यस्रोतांद्वारे शिक्षकांची सेवा घेण्याचा अर्थ काय,' असा सवाल माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, 'शिक्षण घेऊन पात्रता मिळवलेल्या, शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांनी यातून काय अर्थ घ्यायचा? २०२२मधील प्रस्ताव आता मंजूर केला जातो, म्हणजे इतकी प्रचंड



पदे अद्याप भरलेली नाहीत हे आश्चर्य आहे. शिक्षण क्षेत्रात नेहमी विसंगत आदेशांचा अनुभव येत आहे.'

आदिवासी विकास विभागांच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी १९७२-७३ पासून शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वित केलेली आहे. ही योजना मुख्यत्वे अतिदुर्गम, डोंगराळ व पाड्यातील आदिवासी मुला-मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना सुशिक्षित करणे आणि त्यायोगे त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबविण्यात येते. शिक्षणाची गंगा दऱ्याखोऱ्यांत, दुर्गम पाड्यांत पोहोचविण्याचे काम शासकीय आश्रम शाळांमार्फत होत आहे.

# पाकिस्तानच्या कुरापती थांबेपर्यंत सिंधू करार स्थगित

## भारताने संयुक्त राष्ट्रांसमोर पुन्हा एकदा पाकिस्तानला आरसा दाखवला

**नवी दिल्ली :** भारताने संयुक्त राष्ट्रांसमोर पुन्हा एकदा पाकिस्तानला आरसा दाखवला आहे. ''पाकिस्तान सातत्याने दहशतवादाला खतपाणी घालत असल्यामुळे आम्ही त्यांच्याबरोबरचे सर्व संबंध तोडले आहेत', भारताने म्हटलं आहे की पाकिस्तानच्या कुरापती थांबल्या नाहीत तर सिंधू करार असाच स्थगित राहील (स्थगितीचा कालावधी वाढेल). पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही तोवर ही स्थगिती कायम राहील. पाकिस्तान हा सातत्याने सिंदू जलकराराचं उल्लंघन करतोय. त्यामुळे आम्ही देखील स्वस्थ बसू शकत नाही असं भारताने यूएनसमोर स्पष्ट केलं आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानबरोबरचा सिंदू जलकरार स्थगित केला आहे. दरम्यान, संयुक्त राष्ट्रांमध्ये जल करारावरील आरिया फॉर्म्युला बैठकीत भारताचे प्रतिनिधी पार्वतानेनी हरीश यांनी सिंधू जलकरार कधीपर्यंत स्थगित राहील याची माहिती दिली.




संयुक्त राष्ट्रांमध्ये भारताचे प्रतिनिधी पी. हरीश म्हणाले, ''भारताने ६५ वर्षांपूर्वी अत्यंत सद्भावनेने सिंधू जलकरार केला होता. या काळात पाकिस्तानने आमच्याशी तीन वेळा युद्धे केली, आमच्या देशात हजारो दहशतवादी हल्ले घडवून आणले. त्यांनी आमच्या सहनशीलतेचा अंत पाहिला. त्यांच्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये २०,००० भारतीय नागरिक मारले गेले आहेत. पहलगाममधील दहशतवादी हल्ला हे त्यापैकी ताजं उदाहरण आहे. परंतु, भारताने नेहमी संयम आणि धीर दाखवला.

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद भारताची डोकेदुखी ठरतोय''

पी. हरीश म्हणाले, पाकिस्तानच्या सीमेवरील कुरापती, युद्धे, दहशतवादी कारवाया चालू असताना दुसऱ्या बाजूला भारताने नेहमीच असाधारण संयम, धीर व उदारता दाखवली आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद भारताची डोकेदुखी ठरतोय. सीमेवरील नागरिकांचं जीवन विस्कळीत राहिलं आहे, तिथल्या अर्थिक विकासासमोर अडचणी निर्माण होत आहेत. गेल्या ६५ वर्षांमध्ये धरणांच्या पायाभूत सुविधांमध्ये बरेच बदल झाले आहेत, तंत्रज्ञान देखील बदललं आहे. तरी काही जुनी धरणं सुरक्षेसंबंधीच्या आव्हानांचा सामना करत आहेत.''

# शेतकऱ्यांकडे सिबिल विचारू नका : मुख्यमंत्री

मुंबई : शेतकऱ्यांना कर्ज देताना त्यांच्याकडे सिबिलची मागणी करू नका असं म्हणत मुख्यमंत्रांनी आयसीआयसीआय, एचडीएफसी, ॲक्सिस बँकांना चांगलंच झापलं. तसे आदेश रिझर्व्ह बँकेने सुद्धा दिले आहेत, उल्लंघन करणाऱ्या बँकांवर सरकारने गुन्हा दाखल केला आहे असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज्याच्या आणि शेतकऱ्यांच्या सर्वसमावेशक विकासासाठी राज्य सरकार आणि बँकांनी एकत्रित काम केलं पाहिजे मुख्यमंत्री म्हणाले. मुंबईत राज्यस्तरीय बँकर्स समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी बँकांना काही सूचना केल्या. शेतकऱ्यांना सिबिल मागू नका हे बँकांना वारंवार सांगितले गेले आहे. तरीही त्यांच्याकडून सिबिल मागितले जाते. आम्ही अशा बँकावर एफआयआर पण केले. पण तुम्हालाच हे गांभीयनि घ्यावे लागेल. त्यावर तोडगा काढा अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी बँकांना केल्या. सिबिलसंदर्भात रिझर्व्ह बँकेने सुद्धा बँकांना स्पष्ट आदेश दिले आहेत.

# आम्हीच १४० कोटी : न्या. दत्ता

**नवी दिल्ली :** भारत धर्मशाळा नाहीय, जगभरातून आलेल्या निर्वासितांना भारतात आश्रय का द्यावा ? आम्ही आधीच १४० कोटी लोक संघर्ष करत आहोत. प्रत्येक कोपऱ्यातून आलेल्या निर्वासितांना आश्रय देऊ शकत नाही. अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश दीपांकर दत्ता यांनी श्रीलंकेहून तमिळ निर्वासिताला अटक केल्याप्रकरणी हस्तक्षेप करण्यास नकार देत तेच सोडण्याचा आदेश दिला.



## निर्वासिताला देश सोडण्याचा आदेश

श्रीलंकेच्या नागरिकाला ताब्यात घेण्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. परंतु, न्यायालयाने याप्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर खंडपीठात सुनावणी पार पडली. यूएपीए प्रकरणात ठोठावण्यात आलेल्या ७ वर्षांच्या शिक्षेची मुदत पूर्ण झाल्यानंतर याचिकाकत्याने ताबडतोब भारत सोडावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. वर्ष २०१५ मध्ये याचिकाकर्त्याला अन्य दोन लोकांबरोबर एलटीटीई ऑपरेटिव्ह होण्याच्या संशयावरून अटक करण्यात आली होती. तर २०१८ मध्ये याचिकाकर्ता युएपीए कलम १० अंतर्गत गुन्ह्याखाली ट्रायल कोर्टात दोषी सिद्ध झाला होता. त्याला या प्रकरणात दहा वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. न्यायमूर्ती दत्ता म्हणाले, कलम १९ नुसार भारतात स्थायिक होण्याचा मुलभूत अधिकार फक्त येथील नागरिकांनाच आहे.

# मालेगाव-मनमाड-येवला-कोपरगाव रस्त्याचे सहापदरी काँक्रीटीकरण

**येवला :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी येवला शहर उड्डाणपूल किंवा बायपाससह मालेगाव, मनमाड, येवला, कोपरगाव रस्त्याचे सहापदरी काँक्रीटीकरण करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याच्या सूचना सबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्याचबरोबर येवला तालुक्यातील मनमाड रेल्वे मार्गावरील लेव्हल क्रॉसिंग क्रमांक ७४, ७६, ७७येवला शहरा जवळील नांदगाव रोड, नागडे रोड आणि नांदेसर रोडच्या रेल्वे गेटच्या जागी रोड ओव्हर ब्रिज उभारण्यासाठी सेतुबंधन योजनेतून केंद्र सरकार कडून तातडीने प्रस्ताव मागविला जाईल, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी माजी खासदार समीर भुजबळ यांना दिली आहे.

राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांच्या सुचनेनुसार येवला विधानसभा मतदारसंघातील विविध रस्ते व पुलांच्या कामांबाबत बुधवारी दिल्ली येथे समीर भुजबळ यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. तसेच त्यांना या कामांबाबत निवेदने दिले. यावेळी या विकास कामांबाबत मंत्री नितीन गडकरी यांच्याशी समीर भुजबळ यांनी सविस्तर



चर्चा केली. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ यांनी मंत्री छगन भुजबळ यांचे विविध कामांबाबतचे पत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना देत राष्ट्रीय महामार्ग मूळ प्रकल्प वार्षिक कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत येवला शहर उड्डाणपूल किंवा बायपाससह मालेगाव मनमाड येवला कोपरगाव रस्त्याचे अपग्रेडेशन करून सहापदरी काँक्रीटीकरण रस्ता तातडीने मंजूर करण्यात यावा अशी मागणी केली. तसेच या रस्त्यावरील होणारी मोठी वाहतूक तसेच आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर उत्तर भारतातील भाविकांना नाशिक त्र्यंबकेश्वर येथे येण्यासाठी हा प्रकल्प अतिशय महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंत्री नितीन गडकरी यांनी तातडीने या रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना सबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. त्याचबरोबर २०२५-२६ दरम्यान महाराष्ट्र राज्य (जिल्हा नाशिक) मध्ये सीआरएफ अर्थात सुधारित मध्यवर्ती रस्ते आणि पायाभूत सुविधा निधीतून मंजूर करण्यात येणाऱ्या कामांच्या अंतर्गत येवला मतदारसंघातील रस्त्यांना निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. यामध्ये पुढच्या टप्प्यात या रस्त्यासाठी निधी मंजूर करण्यात येईल असे आश्वासन मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.

# माढा येथे मंगळवारी राज्यस्तरीय केळी परिषद

**सोनई:** केळी उत्पादक शेतकरी संघ महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय तिसरी राज्यस्तरी केळी परिषद मंगळवारी (दिनांक २७) सकाळी १०.३० वाजता जगदाळे मंगल कार्यालय, वैराग रोड, माढा, ता. माढा, जि. सोलापूर येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती केळी उत्पादक शेतकरी संघाचे अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष पुरूशोत्तम सर्जे यांनी दिली.

परिषदेत महाराष्ट्रातील केळी शेतीचे आजचे चित्र सर्वांच्या नजरेसमोर आहे. केळी पिकाची शेती करणारे शेतकऱ्यांची स्थिती बरीचशी नाजूक झाली असून केळी पिकाच्या समस्या वाढत आहेत. या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी केळी पिकाच्या शेतीतील विचारवंत आणि केळी पिकाशी पुरक उद्योजकांनी एकत्रित येवून या परिस्थितीवर योग्य चर्चा करून त्याचे कारण शोधून त्याच्यावर ठोस उपाययोजना



सुचविण्याची गरज निर्माण झाली असून केळीचा शालेय पोषण आहारामध्ये समावेश, हमीभाव, पिकविमा, केळी या पिकाचा भाऊसाहेब फुंडकर योजनेत समावेश या व इतर अनेक गरजेची पुर्तता करण्यासाटीचं केळी उत्पादक शेतकरी संघ महाराष्ट्र राज्य यांचे वतीने राज्यस्तरीयत तिसऱ्या केळी परिषदेचे आयोजन केलेले आहे.

परिषदेत संघाचे अध्यक्ष किरण चव्हाण मार्गदर्शन करणार आहेत. मा. खासदार धैर्यशील मोहीते पाटील, आमदार अभिजीत पाटील व मा. आमदार नारायण पाटील, दादासाहेब साटे, जिल्हा कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, अतुल माने उपस्थित राहणार आहेत. योगेश महसे यांचे मनोहर पाटील डॉ. विद्या सोनवणे यांचे मार्गदर्शन होणार आहे. शेतकऱ्यांनी परिषदेस उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन सर्जे यांनी केले. यावेळी अतुल माने, डॉ. हनुमंत चिकणे, किशोर चौधरी, छगन गुजर, उत्तम पाटील, राजेश नवाल, पंढरीनाथ इंगळे, सचिन कोरडे, महेंद्र पाटील, वैभव पोळ, पुरुषोत्तम सर्जे, धिरज पाटील, ओंकार पवार, केशव गायकवाड, रत्नाकर पाटील उपस्थित होते.

# 'ईडी' कडून संघराज्यीय रचनेचे उल्लंघन

## सरन्यायाधीश गवई यांचे ताशेरे

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी ईडीच्या काही कारवायांवर कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली. एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान ईडी मर्यादा सोडत असल्याचे विधान सरन्यायाधीश गवई यांनी केले. राज्यातील संस्थांना टार्गेट करत ईडी संघराज्यीय रचनेचे उल्लंघन करत असल्याचे ताशेरेही सरन्यायाधीशांनी ओढले आहेत. कोटनि याबाबत ईडीला नोटीस जारी केली आहे.

गेल्या काही वर्षांत देशभरात सक्तवसुली संचालनालय म्हणजेच 'ईडी'च्या कारवाया वाढल्या आहेत. अनेक भ्रष्टाचाराची, मनी लॉन्ड्रिंगची प्रकरणे ईडीने समोर आणली आहेत. पण काही कारवायांबाबत राजकीय आरोप-प्रत्यारोपही झाले आहेत. केंद्र सरकारच्या इशाऱ्यावरून ईडी राजकीय नेत्यांवर कारवाई करत असल्याचा आरोप केला जातो. सुप्रीम कोर्टात गुरूवारी तमिळनाडू स्टेट मार्केटिंग कॉर्पोरेशनवरील ईडीच्या कारवाईबाबत सुनावणी झाली. कोर्टान याप्रकरणात ईडीच्या तपासाला तात्पुरती स्थगिती देताना त्यावर नाराजी व्यक्त केली आहे. सरन्यायाधीश गवई यांनी कडक शब्दांत ताशेरे ओढले.

पान १ वरुन

## ८ दिवस आधीच केरळमध्ये मान्सून दाखल

होण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. २५ मे पर्यंत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता वर्तवली आहे. मुंबईत साधारण १ जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. पूर्व-मध्य अरबी समुद्रात, कर्नाटकच्या किनाऱ्याजवळ कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. हे क्षेत्र २३ मेच्या संध्याकाळपर्यंत तोत्र होऊन अवदाबमध्ये रूपांतरित होण्याची शक्यता आहे. याच्या प्रभावामुळे कोकण (मुंबई, ठाणे. पालघर, रायगड, रत्नागिरी), मध्य महाराष्ट्र (पुणे, सातारा, सोलापूर), मराठवाडा (बीड, परभणी, नांदेड) आणि विदर्भातील काही भागांत जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने २२ ते २४ मे दरम्यान कोकण, गोवा आणि पश्चिम किनारपट्टीसाठी अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः मुंबई आणि परिसरात २३ मे रोजी संध्याकाळपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे जलमय परिस्थिती आणि वाहतूक कोंडी निर्माण होऊ शकते. मुंबई महानगर प्रदेशासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट दिला गेला आहे. २७ मेपर्यंत समुद्रात जाण्यास बंदी हवामान खात्याने केरळच्या किनारी आणि अंतर्गत भागात वादळाचा इशारा जारी केला आहे. मच्छिमारांसह सामान्य लोकांना खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीपच्या किनाऱ्यावर २७ मे पर्यंत मासेमारीसाठी समुद्रात जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. राज्यात यावेळी नौतपादरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने पुढील सात दिवस वादळ आणि पावसाचा इशारा जारी केला आहे. याचे कारण राज्यातील चक्रवाती अभिसरण आणि ट्रफ ॲक्टिव्हिटी आहे. आज भोपाळ, इंदूर, ग्वाल्हेर, जबलपूर, उज्जैनसह एकूण ४७ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उद्यापासून राज्यात नौतापा सुरू होत आहे, परंतु त्याचा परिणाम आजपासूनच दिसून येईल. राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये पावसाचा परिणाम दिसून येईल आणि चार जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा परिणाम दिसून येईल. नौतपा दरम्यान सूर्याची तीव्रता वाढते.

## पुण्याच्या खराडीत बनावट कॉल सेंटरचा पर्दाफाश

अनेक लोकांची चौकशी सुरू आहे. तर पाच जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे. हे रॅकेट (Pune Police Raid) अमेरिकेतील लोकांना फसवायचे अशी माहिती समोर आली आहे. सायबरचा मोठा फ्रॉड होत होता अशी माहिती समोर आली आहे. या छाप्यात ४१ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. लॅपटॉपमधील अनेक महत्त्वाचा डाटा सायबर पोलिसांनी जप्त केला आहे. अमेरिकेमधील लोकांना फसून डिजिटल अटक करण्याच्या नावाखाली फसवायचे आणि पैसे मागायचे अशी माहिती समोर आली आहे. सायबर पोलीसांनी ६१ लॅपटॉप (डर्ग्गिी) जप्त केले आहेत. शंभर ते दीडशे लोक काम करत असल्याची माहिती आहे. सर्व गुजरातचे असून मुख्य आरोपी देखील गुजरातचा असल्याची माहिती आहे. खराडीतील गुजरातच्या लोकांचा कॉल सेंटर सायबर पोलिसांनी उध्वस्त केला आहे.

## काश्मीरमध्ये अहिल्यानगरच्या सुपुत्राला वीरमरण

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याचे सुपुत्र जवान संदीप गायकर हे जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा सामना करताना शहीद झाले. गायकर हे मूळचे करंडी गावचे रहिवासी होते. अवघ्या ९ महिन्यांपूर्वीच ते लष्करात मराठा आरआर बटालियनमध्ये दाखल झाले होते. भारतीय लष्कराच्या व्हाइट नाइट कोअरने सोशल मीडियावर चकमकीची माहिती दिली. त्यात एक जवान शहीद झाल्याचं सांगितलं. गुरुवारी सकाळी किश्तवाडच्या छत्र इथं पोलिसांसोबत संयुक्त मोहिम राबवत होते. त्यावेळी दहशतवाद्यांसोबत चकमक झाली. अजूनही गोळीबार सुरू आहे. या गोळीबारात एक जवान गंभीर जखमी झाला होता. पण उपचारावेळी त्याला वीरमरण आले, असे व्हाइट नाइट कोअरने सांगितले. किश्तवाडमध्ये सकाळी सात वाजण्याच्या सुमारास लष्कराच्या दोन पॅरा एसएफ, ११ आरआर आणि सातवी आसाम रायफल आणि एसओजी यांनी दहशतवाद्यांविरोधात संयुक्त मोहिम राबवली. सिंहपोरा चटरू इथं पथकांकडून शोध सुरू होता.

## बांधावरचा शेत रस्ता यापुढे १२ फुटांचा

शेतकऱ्यानी मागणी केलेल्या शेतरस्त्याच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन शेतरस्त्याची आवश्यकता तपासावी. अस्तित्वात असलेले नैसर्गिक मार्ग, पाऊलवाटा, इतर वहिवाटीचे मार्ग तसेच स्थानिक भौगोलिक परिस्थिती तपासावी. शेजारच्या भूधारकांच्या वहिवाटीच्या हक्कांचा आणि त्यांच्या अडचणींचा व आक्षेपांचा विचार करावा. सदर बाबी विचारात घेऊन वाढत्या यांत्रिकीकरणाच्या अनुषंगाने जर थेट योग्य शेतरस्ता आता १२ फुटांचा रुंदीचा शेतरस्ता कोणत्याही कारणाने उपलब्ध करुन देणे शक्य नसेल परंतु रुंद शेतरस्त्याची आवश्यकता असेल तर इतर पर्यायी आणि सोयीस्कर मार्गाचा विचार करावा, जरी तो थोडा लांबचा असला तरी चालेल. आणि ते देखील शक्य नसेल तर अपवादात्मक परिस्थितीमध्येच आवश्यकतेनुसार ३ ते ४ मीटर पेक्षा कमी परंतु जेवढा जास्त रुंद शेतरस्ता उपलब्ध करुन देणे शक्य असेल तेवढा उपलब्ध करुन द्यावा. बांध हे केवळ दोन शेतांच्या सीमा नसून ते पाणी व्यवस्थापनासाठी आणि जमिनीची धूप थांबवण्यासाठी महत्त्वाचे असतात. त्यामुळे बांधावरून रस्ता देतांना त्याचे नैसर्गिक स्वरूप शक्यतोवर टिकवून ठेवावे. रस्त्यांची रुंदी शेतीमध्ये वाढत्या यांत्रिकीकरणाच्या अनुषंगाने ठेवावी, परंतु अनावश्यक रुंदीकरण टाळावे. तसेच बांधावरून रस्ता दल्यानंतर दोन्ही बाजूंच्या सीमांची निश्चिती करावी, जेणेकरून भविष्यात सीमांवरून कोणताही वाद निर्माण होणार नाही. ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात शेत रस्त्याची नोंद झाल्यामुळे त्या रस्त्याची कायदेशीर वैधता स्थापित होईल व भविष्यात शेतरस्त्यांच्या वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, तसेच जमीन खरेदी-विक्रीच्या वेळी संभाव्य खरेदीदाराला जमिनीवरील या महत्त्वाच्या हक्काची माहिती मिळेल. सबब, ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात शेत रस्त्याची नोंद घेण्याच्या अनुषंगाने संबंधित क्षेत्रीय अधिकारी /प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

## छगन भुजबळ यांचं मंत्रिमंडळात पुरागमन

मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे परत आलोय असं वक्तव्य भुजबळ यांनी केलं. २०२४ च्या निवडणुकीनंतरही माझ्या मंत्रिपदासाठी फडणवीस यांनी आग्रह धरला होता. मात्र तेव्हा पक्षाने निर्णय घेतला नाही हे सांगायलाही भुजबळ विसरले नाहीत. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मंत्रिमंडळात कमबॅक झाल्याचं मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितलं खरं तर दुसरीकडे मी राष्ट्रवादीचा मंत्री आहे. भाजपचा मंत्री नाही असंही स्पष्ट केलं आहे. पक्षाचा निर्णय अंतिम असल्याचं म्हणत अजितदादा नाराज होणार नाहीत याचीही काळजी घेतल्याचं दिसलं. मंत्रिमंडळातून पत्ता कट झाल्यानंतर दरम्यानच्या काळात छगन भुजबळ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात जवळीत वाढल्याचं पाहायला मिळालं होतं.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय-प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |
| **कृषि विषयक पुस्तके** | | |
| **डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील** | | |

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Vision India

Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com
Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# आठ हजारांवर गावे शिक्षणापासून वंचित!

## शैक्षणिक विकासाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह; ठोस उपाययोजनांची गरज

**पुणे :** महाराष्ट्रातील आठ हजारांहून अधिक गावे शिक्षण सुविधेपासून वंचित आहेत. या गावांमध्ये प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक स्तरावरची कोणतीही शाळा उपलब्ध नाही, ज्यामुळे या भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. शिक्षण सर्वांसाठी महत्त्वाचे आहे आणि वा आकडेवारीमुळे राज्यातील शैक्षणिक विकासाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. राज्यातील शिक्षण व्यवस्थेसाठी एक गंभीर आणि विचार करायला लावणारी बाब आहे.

केंद्र सरकारने नुकतीच शैक्षणिक परिस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने काही महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्यातील आठ हजारांहून अधिक गावामध्य शाळा नसणे हे निश्चितच चिताजनक आाहे. शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त तसेच प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील आणि राज्य शेक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक रमाकांत काठमोरे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत राज्यातील शाळा नसलेल्या गावाचा मुद्दा आणि तेथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था यावर सखोल चर्चा झाली. या बैठकीमध्ये शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सद्यस्थितीची माहिती दिली. त्यानुसार, राज्यात ६.५६३ गावे अशी आहेत जिथे उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध नाहीत, तर १,६१० गावामध्ये प्राथमिक शाळांची सोय नाही. या गंभीर परिस्थितीमुळे या गावातील मुलांना शिक्षणासाठी इतर गावांतील शाळांवर अवलंबून राहावे लागते किंवा अनेकदा शिक्षणापासून वंचित राहावे लागते. दूर असलेले शिक्षण आणि वाहतुकीच्या गैरसोयीमुळे अनेक विद्यार्थी शिक्षणाला मुकण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागांमध्ये शिक्षण पोहोचवणे हे शिक्षण विभागासाठी एक मोठे आव्हान आहे. राज्यातील शिक्षण विभागाकडून या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आतापासूनच उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी या संदर्भात कसून प्रयत्न करत आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या गावातच शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी विविध पर्यायांचा विचार केला जात आहे. नवीन शाळा उघडणे, असलेल्या शाळांची क्षमता वाढवणे किंवा वाहतूक आणि इतर सुविधा पुरवणे यांसारख्या उपायांवर भर दिला जाण्याची शक्यता आहे. लवकरच यासंदर्भात ठोस योजना तयार करून तिची अंमलबजावणी केली जाईल. अशी अपेक्षा आहे.



### शाळा नसलेली जिल्हानिहाय गावे

अहिल्यानगर (४७), सोलापूर (४७), चंद्रपूर (४०), नाशिक (३९), अमरावती (६), छत्रपती संभाजीनगर (४१), धाराशिव (४३), ठाणे (३९), परभणी (४९), पुणे (४२), बुलढाणा (४४), बीड (६), रायगड (४), रत्नागिरी (६३), यवतमाळ (५५), हिंगोली (३९), कोल्हापूर (५), सिंधुदुर्ग (४), सातारा (४२), जळगाव (३०), जालना (३), धुळे (६), नंदुरबार (५, नाशिक ग्रामीण १०), पालघर (३०).

## अहिल्यानगरचे पालवे, परकाळे यूपीएससीत चमकले!

**पाथर्डी :** केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे आयोजित इंडियन फॉरेस्ट सर्व्हिसेस (आयएफएस) परीक्षेत जिल्ह्यातील दोघांनी यश मिळविले आहे. अहिल्यानगरची अश्विनी परकाळे-भगत, तर पाथर्डीचा हरिओम दगडू पालवे यांनी या परीक्षेत बाजी मारली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी जाहीर झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही अहिल्यानगरच्या तिघांनी बाजी मारली आहे.

अश्विनी परकाळे या झुंबर पिंपरी (ता. आष्टी) येथील मूळ रहिवाशी आहेत. त्यांचे वडील देवराव परकाळे हे माध्यमिक शिक्षक म्हणून लोणी सय्यदमीर (ता. आष्टी) येथे कार्यरत आहेत. सांगली येथे बी. टेक पदवी घेतल्यानंतर यूपीएससीचा अभ्यास सुरू केला. नाशिक येथील दीपक बाळासाहेब भगत यांच्याशी २०२३ मध्ये विवाह झाला. हरिओम पालवे हे सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डी. के. पालवे यांचे सूपुत्र आहेत. पालवे यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महालक्ष्मीवरे (ता. नेवासे) येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण पाथर्डी येथील तिलोक जैन विद्यालयात झाले. संगणकशास्त्र शाखेतील पदवी त्यांनी डी. वाय. पाटील महाविद्यालयातून प्राप्त केली.

## अभिनेते मुकुल देव यांचे निधन

**मुंबई :** हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांचे लोकप्रिय अभिनेते मुकुल देव यांच्या आकस्मिक निधनाने इंडस्ट्रीला धक्का बसला आहे. मुकुल देव यांनी वयाच्या ५४व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. मुकुल देव यांनी सन ऑफ सरदार', 'आर... राजकुमार', 'जय हो' सारख्या सिनेमांमध्ये काम केलं होतं. मुकुल देव शेवटचे 'अँथ द एंड' या हिंदी चित्रपटात दिसले होते.

मुकुल देव यांचा जन्म १७ सप्टेंबर १९७० रोजी नवी दिल्लीतील एका पंजाबी कुटुंबात झाला. त्यांनी १९९६ मध्ये 'मुमकिन' या टीव्ही मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. नंतर, टीव्ही व्यतिरिक्त, त्यांनी हिंदी तसेच पंजाबी, बंगाली, मल्याळम, कन्नड आणि तेलगू भाषेतील ६० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं होतं.

## संत ज्ञानेश्वर महाराज साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी राजेंद्र फंड

**नेवासा :** लोककला कलावंत साहित्यिक परिषदेच्यावतीने घेण्यात येणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी कवी, साहित्यिक राजेंद्र फंड यांच्या निवडीची घोषणा या संमेलनाचे संयोजक साहित्यिक बाबासाहेब पवार यांनी नुकतीच केली आहे. १ जूनला श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील त्रिंबकेश्वर सभागृहात हे साहित्य संमेलन पार पडणार आहे. अध्यक्षपद जेष्ठ साहित्यिक बाबुराव उपाध्ये भूषविणा आहेत. बाबा महाराज ससाणे उद्घाटक असतील. सिद्धीविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष वासुदेव काळे, कामगार नेते अविनाश आपटे, रिपाईचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन, काटे स्वामी पतसंस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध महाले, सोमनाथ महाले, पत्रकार प्रकाश कुलथे, पत्रकार विकास अंत्रे, करण नवले, सरपंच चंद्रकला पवार, आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

## शुभमन टेस्टचा ५ वा कर्णधार

मुंबइ : फलंदाज शुभमन गिलला भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार बनवण्यात आले आहे. ऋषभ पंतची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. शनिवारी मुंबईत झालेल्या बैठकीत बीसीसीआयने याची घोषणा केली. तसेच, इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यीय संघाची घोषणा करण्यात आली. २० जूनपासून सुरू होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यात भारताला ५ कसोटी सामने खेळायचे आहेत.

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या निवृत्तीनंतर साई सुदर्शन आणि करुण नायर यांना संघात स्थान मिळाले आहे. दरम्यान, शार्दुल ठाकूर संघात परतला आहे.

भारतीय संघ शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत (यष्टीरक्षक, उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, नितीश रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, कृष्णा बृहस्पति, दीप प्रभू, कृष्णा कृष्णा, कृष्णा जडेजा. अर्शदीप सिंग आणि कुलदीप यादव.

२५ वर्षे २५८ दिवसांच्या वयात, गिल कसोटी क्रिकेटमध्ये भारताचे नेतृत्व करणारा पाचवा सर्वात तरुण क्रिकेटपटू ठरला. त्याच्या आधी मन्सूर अली खान पतौडी (२१ वर्षे, ७७ दिवस), सचिन तेंडुलकर (२३ वर्षे, १६९ दिवस), कपिल देव (२४ वर्षे, ४८ दिवस) आणि रवी शास्त्री (२५ वर्षे, २२९ दिवस) यांचा क्रमांक लागतो.

**करुणने विदर्भाला रणजी विजेता बनवले**

करुण नायरने गेल्या हंगामात ९ रणजी ट्रॉफी सामन्यांमध्ये ४ शतकांसह ८६३ धावा केल्या होत्या आणि विजय हजारे ट्रॉफीच्या ८ डावांमध्ये ५ शतकांसह ७७९ धावा केल्या होत्या. या विदर्भाच्या फलंदाजाने राज्य संघाला रणजी ट्रॉफीमध्ये विजय आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये दुसरे स्थान मिळवून दिले. त्याला आधीच भारत अ संघात समाविष्ट करण्यात आले आहे, जो काही दिवसांत इंग्लंडला रवाना होईल.

तर २३ वर्षीय सुदर्शन हा आयपीएल-१८ मध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्याने आतापर्यंत ६३८ धावा केल्या आहेत. इंग्लंड लायन्सविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यासाठी त्याला आधीच इंडिया अ संघात स्थान देण्यात आले आहे.

**संघात शार्दुलचे नाव**

शार्दुल ठाकूरचाही संघात समावेश करण्यात आला आहे. तर बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये संघाचा भाग असलेला देवदत्त पडिकल अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त नाही. मोहम्मद शमीला वगळल्यानंतर, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप आणि अर्शदीप सिंग यांना संघात स्थान मिळाले आहे. फिरकी विभागात रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि वॉशिंग्टन सुंदर अशी नावे आहेत. बीजीटीमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या नितीश कुमार रेड्डीचाही संघात समावेश आहे. ऋषभ पंत आणि ध्रुव जुरेल हे दोन यष्टीरक्षक आहेत.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021